सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात कला विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर
ता. संगमनेर जि. अहमदनगर



# इतिहास विभाग

## वर्ग - T.Y.B.A

## विषय - इतिहासाची तोंड ओळख (एस-3)

### प्रकरण - १

# संकल्पनात्मक अभ्यास

विद्यार्थ्यांच्या घेतल्या जाणाऱ्या ऑनलाईन लेक्चरच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पाठ्यपुस्तक पीडीएफ स्वरूपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत आहोत.

- डॉ. टी. बी. राजदेव (विषय शिक्षक)

SCAN BY PRASHANT KASAR (STUDENT)

**प्रकरण १**

# संकल्पनात्मक अभ्यास

## (Conceptual Study)


- १.१ इतिहास
- १.२ स्वयंशोध
- १.३ पुराभिलेख
- १.४ मौखिक इतिहास
- १.५ कालगणना पद्धती
- १.६ सनद
- १.७ मार्क्सवाद
- १.८ नवमार्क्सवाद
- १.९ आधुनिकवाद/आधुनिकतावाद
- १.१० उत्तर आधुनिकवाद
  - १.१०.१ उत्तर आधुनिकवाद : अर्थ
  - १.१०.२ उत्तर आधुनिकवाद : व्याख्या
  - १.१०.३ उत्तर आधुनिकवादाची वैशिष्ट्ये
  - १.१०.४ आधुनिकवादाचे स्वरूप
- १.११ संरचनावाद
  - १.११.१ संरचनावाद : अर्थ
  - १.११.२ संरचनावाद : व्याख्या
  - १.११.३ संरचनावादाचा उदय
  - १.११.४ संरचनावादाची मूलभूत तत्त्वे
- १.१२ उत्तर संरचनावाद


### प्रस्तावना

इतिहासाची ओळख करून घेत असताना इतिहासातील अनेक संकल्पनांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. इतिहासाचा सखोल अभ्यास करण्यासाठी या संकल्पनांचा अर्थ समजावून घेणे, इतिहासातील या संकल्पनांचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे असते. या संकल्पनांमुळे गतकालीन इतिहास अधिक स्पष्ट होण्यास मदत होत असते. म्हणूनच इतिहासाच्या अभ्यासात या संकल्पनांना अनन्य साधारण महत्त्व आहे. इतिहास, स्वयंशोध, पुराभिलेख, मौखिक इतिहास, कालगणना, सनद, मार्क्सवाद, नवमार्क्सवाद, आधुनिकवाद, संरचनावाद, उत्तर संरचनावाद या सर्व संकल्पना समजावून घेतल्यास इतिहासाची ओळख होण्यास मदत होते. भूतकाळातील घटकांचा अभ्यास म्हणजे इतिहास होय. इतिहासाचा अभ्यास करताना निरनिराळ्या साधनांचा वापर केला जातो. त्या साधनांचा वापर करताना मात्र त्यासाठी आधी परीक्षण करावे लागते. साधनांच्या साहाय्याने इतिहासकार इतिहासातील सत्य परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. विविध पुरभिलेख इतिहास जाणून घेण्यासाठी साहाय्यभूत ठरतात. शिवाय काही लोककथा या मौखिक परंपरेने जतन करून ठेवलेल्या

असतात. या लोककथा देखील इतिहासाचे जतन करून ठेवण्यास मदतशीर ठरतात. इतिहासाचे स्पष्टीकरण करताना त्यासाठी कालखंडाचा आधार घेणे आवश्यक ठरते. इतिहासाचा जसजसा विकास होत गेला तसतसा आधुनिकता, उत्तर आधुनिकता, संरचनावाद, उत्तरसंरचना या सर्व संकल्पनांचा विकास होत गेला. आपण या पाठात या सर्व संकल्पनांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

इतिहास

## १.१ इतिहास (History)

भूतकाळाचे आकलन म्हणजे इतिहास होय. भूतकाळात ज्या काही घटना घडून गेलेल्या आहेत, त्यांचा समावेश इतिहासात होतो. हेरोडोट्स या ग्रीक इतिहासकाराने History या शब्दाचा वापर सर्वप्रथम केला होता. History याचा अर्थ जाणून घेणे किंवा ज्ञात करून घेणे होय. भूतकालीन घटना जाणून घेणे किंवा ज्ञात करून घेणे असा त्याचा अर्थ आहे. त्यामुळे इतिहास म्हणजे केवळ 'सनावळ्यांचा अभ्यास' नाही. तर इतिहासामध्ये सन आणि घटना व या घटनांमागील उद्देश, विचार व निष्पत्ती यांचा सविस्तरपणे अभ्यास केला जातो. इतिहास या शब्दाला इंग्रजीत History असा प्रतिशब्द वापरला जातो. हा इंग्रजी शब्द ग्रीक शब्द Istoria वरून तयार झाला आहे. त्याचा अर्थ शोध घेणे व ज्ञान मिळविणे असा होतो. इतिहास म्हणजे घडलेल्या घटनांचा शोध घेणे व त्याचा अन्वयार्थ लावून त्या घटना योग्य क्रमाने मांडणे व घटनाक्रमाची यथार्थ माहिती देणे होय. इतिहास या शब्दाची फोड इति+ह+आस अशी केली जाते. थोडक्यात इतिहास म्हणजे घडलेल्या घटनांची माहिती देणे होय. इतिहासात भूतकालीन घटनांचा अभ्यास तसेच त्यांच्यासंबंधी विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. इतिहासाच्या अभ्यासाने मानवाला भूतकाळात घडलेल्या घटनांच्या आधारे आपला भविष्यातील मार्ग सुकर करता येतो. इतिहासातील प्रत्येक टप्प्यावर मनुष्याची प्रगती कशी व किती झाली हे लक्षात येते.वेगवेगळ्या इतिहासकारांनी इतिहासाच्या व्याख्या दिल्या आहेत. त्यावरून इतिहासाचा अर्थ अधिक समजण्यास मदत होईल.

१) **थ्युसिडाईडस् :**
   'इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन.'

२) **ॲरिस्टॉटल :**
   'इतिहास हा न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे.'

३) **फ्रान्सिस बेकन :**
   'इतिहास ही मानवाला सूज्ञ बनविणारी ज्ञानशाखा आहे.'

४) 'भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन जे घडले त्याचे तसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्णरीत्या करणे म्हणजे इतिहास होय.'

S. M. B. S. T. COLLEGE LIBRARY
ACC NO. ७२०३८
PRICE
S. M. B. S. T. College, Sangamner S.B.V.P.S.

स्वयंशोध

## १.२ स्वयंशोध (Heuristics)

Heuristics हा शब्द Heuriskein या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ शोधून काढणे असा होतो. प्रा. रेनीयर यांच्या मते, Heuristics हे एक तंत्र आहे. तसेच ते शास्त्र नसून ती एक कला आहे. त्यात कोणतेही नियम नाहीत. बहिरंग परीक्षण पद्धतीलाच ग्रीक भाषेत Heuristics असा मूळ शब्द आहे. Heuristics याचा अर्थ शिकणाऱ्याने स्वतःच प्रयत्न करत, चुकत-माकत, त्यातून सुधारणा करीत प्रश्न किंवा समस्या

सोडविणे होय. इतिहासाचा अभ्यास करताना साधनांचे परीक्षण करणे आवश्यक असते. साधनांची सत्यता खऱ्या इतिहासापर्यंत पोहोचविण्यासाठी मदत करत असते. कागदपत्रांच्या परीक्षणासाठी व विश्वासार्हतेसाठी, बहिरंग परीक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते. स्वयंशोधनातून बहिरंग परीक्षण केले जाते. ज्या ज्या वेळी नवीन माहिती, पुरावा कागदपत्रे सापडतात, त्या त्या वेळी त्यांचे पुन्हा पुन्हा परिक्षण करावे लागते. उपलब्ध झालेला कागद हा मूळ स्वरूपात आहे की त्याची नक्कल आहे याचाही विचार करावा लागतो. कित्येक वेळा एखाद्या कागदपत्राची अगर हस्तलिखिताची नक्कल करीत असताना काही चुका होऊ शकतात किंवा काही शब्द गळतात तर कित्येकदा मुळात नसलेले शब्द त्यात घातले जातात. परीक्षणाद्वारे कागद मूळ स्वरूपात आहे की नक्कल हे तपासून पाहता येते. हस्तलिखिते किंवा कागदपत्रावर लेखकाचे नाव असेल तर त्याच्या इतर लिखाणांची माहिती मिळवून त्याचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. दोन्ही कागदपत्रांतील अक्षरांचे वळण, शब्दातील साम्य किंवा फरक, शब्दांची मांडणी याबाबत तुलना करावी लागते. अशाप्रकारे या सर्व प्रक्रियेतून कागदपत्रांची किंवा पुराव्यांची सत्यासत्यता सिद्ध केली जाते. अशाप्रकारे गतकालीन घटनांचा अभ्यास करत असताना त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांची वस्तुनिष्ठता सिद्ध करून मग त्या आधारेच इतिहासाविषयी सत्य माहिती मिळविणे शक्य होते.

## ८.१.३ पुराभिलेख (Archives)

पुराभिलेख

प्राचीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करताना संशोधकांनी साधने उपलब्ध करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज प्राचीन काळाची बरीच साधने उपलब्ध झालेली आहेत. या साधनांपैकी पुराभिलेख हे साधन होय. प्राचीन काळात लिहिलेला मजकूर म्हणजे पुराभिलेख होय. प्राचीन काळातील लोक लेणी, नाणी, शिला, धातूंचे पत्र, हस्तिदंत, विविध प्रकारच्या वस्तू, भांडी यावर लेख लिहित असत. तत्कालीन परिस्थिती जाणून घेण्यासाठी या पुराभिलेखांचा उपयोग होतो. १९२१ मध्ये मोहेंजोदडो व हडप्पा या ठिकाणांच्या उत्खननातून सिंधू संस्कृतीचा शोध लागला. उत्खननात स्नानगृह, सार्वजनिक इमारती, घरे, भांडी, हत्यारे, खेळणी, जहाज बांधणीची गोदी इत्यादी अवशेष उपलब्ध झाले. पाटलीपुत्र, नालंदा, सांची, तक्षशिला, सारनाथ, नेवासे, पितळखोरा, पैठण, तेर, मोकरदन इत्यादी ठिकाणांच्या उत्खननातून अनेक प्राचीन वस्तूंचे अवशेष उपलब्ध झाले आहेत. या अवशेषांवरून तत्कालीन सामाजिक व आर्थिक जीवनातील विविध घटकांवर प्रकाश टाकणे शक्य होते.

१) लेणी :

विविध प्रकारच्या लेण्यांवरील लेख गतकाळातील इतिहासावर प्रकाश टाकतात. सातवाहन काळात डोंगराच्या अंतर्गत भागात लेणी किंवा गुहा कोरल्या गेल्या. तसेच मुंबई, पुणे, नाशिक, कार्ले, भाजे येथील लेणी मुख्यतः बौद्ध धर्मियांनी कोरलेल्या आहेत. त्यामुळे त्या चैत्य व स्तुप स्वरूपात आहेत. भारतातील विविध भागांत प्राचीन काळी विविध राजवटींनी लेणी कोरल्या आहेत. या लेणींवरील लेख गतकाळातील अनेक गोष्टींवर प्रकाश टाकतात. त्यामुळे लेणी भारतीय इतिहासाचे महत्त्वाचे साधन मानल्या जातात.

२) नाणी :

प्राचीन भारताच्या इतिहासासाठी नाणी हे अव्वल दर्जाचे व अविनाशी असे साधन आहे. नाणी पाडण्याचा अधिकार प्राचीन काळात सत्ताधीश, व्यापारी यांच्याकडे असे. वैयक्तिक आणि खासगी पातळीवरही नाणी पाडली जात. भिन्न-भिन्न काळात उपलब्ध होणाऱ्या नाण्यांवरून प्राचीन काळातील इतिहासासंबंधी बरीच माहिती मिळते. कुशाणांच्या नाण्यावर राजांच्या पदव्यांच्या उल्लेख आहे. यावरून राजाचे अधिकार स्थान तसेच तत्कालीन राजकीय स्थिती आणि धर्म यांचे संबंध स्पष्ट होतात.

३) **शिलालेख :**

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासात शिलालेखांचे स्थान अतिशय महत्त्वाचे ठरते. पहिले भारतीय शिलालेख वाचले गेले ते अशोकाचे. दक्षिणोत्तर आणि पूर्व-पश्चिम दिशांना पसरलेल्या साम्राज्यातील खडकांवर आणि स्तंभांवर कोरलेल्या देशभर पसरलेल्या या प्राकृत व ब्राम्ही लिपितील शिलालेखांतून राजाज्ञा व सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय वर्तणुकीचे नियमन करण्यासाठी केलेल्या घोषणा नमूद केल्या आहेत. अशोकाप्रमाणेच रूद्रदामण, स्कंद्गुप्त, शक, गुप्त या सम्राटांच्या पराक्रमांच्या नोंदी वेगवेगळ्या शिलालेखांवरून मिळतात.

४) **स्तंभालेख :**

इतिहास लेखनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून स्तंभालेखाचा उपयोग होतो. सम्राट अशोकाने एकूण सात स्तंभालेख उभारले होते. एखाद्या विशिष्ट मध्यवर्ती स्थिर अशा स्तंभावर कोरलेल्या आलेखांना स्तंभालेख असे म्हणतात. गुप्तकाळानंतर उभारलेल्या स्तंभांची भाषा बहुतांशी संस्कृत असून त्यातील माहिती पुनरुज्जिवीत हिंदू धर्माशी संबंधित आहे.

५) **ताम्रपट :**

तांब्याच्या जाड पत्र्यावर अक्षरे कोरून ताम्रपट तयार केला जातो. असा ताम्रपट वापरण्यास अत्यंत सुटसुटीत असतो. प्रामुख्याने दानपत्रे, आज्ञापत्रे, जमिनीविषयक हक्कपत्रे ताम्रपटावर असतात. सामान्यतः एक ताम्रपट एका विषयासाठी वापरण्यात येत असे व असे अनेक ताम्रपट तांब्याच्या जाड तारेत अडकवून एकत्र ठेवले जात असत. चालुक्य, सातवाहन, शिलाहार इत्यादी घराण्याचे ताम्रपट मोठ्या प्रमाणावर सापडतात. ताम्रपटावरून राजाची वंशावळ, त्याच्या काळातील महत्त्वपूर्ण घटना, युद्ध, महसूल पद्धती त्याचा प्रजाविषयीचा दृष्टिकोन इत्यादींची माहिती मिळते. प्राचीन भारतीय इतिहासाचे ताम्रपट हे एक उपयुक्त साधन आहे.

## ०३.१.४ मौखिक इतिहास (Oral History)

मौखीक. इतिहास

गतकालीन घटनांचे ज्ञान इतिहासातून होत असते. त्यासाठी इतिहासाची साधने उपयुक्त ठरत असतात. लिखित व अलिखित साधनांद्वारे गतकाळाचा अभ्यास करणे शक्य होते. त्याचप्रमाणे पारंपरिक, सांस्कृतिक आशय असलेली व मौखिक परंपरेने जतन केली जाणारी कथा म्हणजे लोककथा होय. लोककथा या मौखिक असतात. एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या हस्तांतरित होत राहतात. या लोककथांनाच मौखिक इतिहास असे म्हटले जाते. लोककथा या परंपरागत असल्या तरी परिवर्तनशील तसेच प्रवाही असतात. काळाच्या ओघात राजकीय आक्रमणे, व्यापार, प्रादेशिक विस्तार, सांस्कृतिक स्थित्यंतरे यामुळे लोककथा एका प्रदेशाकडून दुसऱ्या प्रदेशात स्थिरावताना दिसतात.

१) **उद्‌बोधनाचे कार्य :**

दंतकथा, लोककथा, मिथ्यके यांच्या मदतीने उद्‌बोधनाचे कार्य करण्याचा प्रयत्न केला जातो. दंतकथा, लोककथा यामध्ये विधायक परिणाम होणाऱ्या घटनांचाच समावेश होतो. इतिहासातील विधायक घटना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देशच समाजाचे उद्‌बोधन व्हावे हा असतो. भूतकाळात झालेल्या चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी दक्षता घेतली जावी असा उद्देश या दंतकथांचा असतो. महायुद्धांमुळे संपूर्ण मानवी जातीचे जे नुकसान झाले, जी हानी झाली पुन्हा तसेच घडू नये याची दक्षता जागतिक पातळीवर घेतली जात आहे. किंबहुना तशी दक्षता घेणे गरजेचे आहे.

**२) राष्ट्रभक्ती निर्माण करणे :**

दंतकथा, लोककथा लोकांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. महात्मा गांधी, भगतसिंग, राजगुरू यांसारखे नेते, समाजसुधारक, क्रांतिकारक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व भारतीयांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला आणि आपला देश स्वतंत्र केला यांसारख्या देशप्रेम, देशभक्तीच्या कथा सांगितल्या जातात. राष्ट्रभक्तीची बीजे लोकांमध्ये रोवण्याचे काम या लोककथा करत असतात.

**३) नैतिक मूल्यांची रुजवणूक :**

दंतकथा, लोककथा, मिथ्यके यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. जिजाबाईंनी शिवरायांना दिलेली शिकवण , शिवरायांची धर्मसहिष्णुता, स्त्रियांचा आदर करणे, कर्तव्याचे पालन निष्ठेने करणे या मूल्याबाबतची जाण वाढत जाते. कोणताही समाज हा काही मूल्यांवर आधारित बनलेला असतो. दंतकथा, लोककथांमुळे अशा परंपरागत मूल्यांची माहिती समाजाला होत असते.

**४) भूतकाळातील चुकांची पुनरावृत्ती टाळणे :**

लोककथा, दंतकथांच्या साहाय्याने भूतकाळात झालेल्या चुकांमुळे जे परिणाम भोगावे लागले त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी मार्गदर्शन केले जाते. भारतीयांमध्ये असलेल्या एकीच्या अभावामुळे इंग्रजांनी दीडशे वर्षे भारतावर राज्य केले. भारतीयांच्या चुकांमुळे इंग्रजांना भारतावर राज्य करण्याची संधी मिळाली होती. अशा चुका पुन्हा होऊ नयेत याची काळजी लोककथांद्वारे घेतली जाते.

**५) धाडसी वृत्ती निर्माण करणे :**

प्राचीन व मध्ययुगीन काळातील राजांनी आपल्या धाडसी वृत्तीने जे कार्य केले ते कार्य लोकांपर्यंत पोहोचविणे आणि लोकांमध्ये धाडसी वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा उद्देश लोककथांचा असतो. शिवाजी महाराजांच्या अंगी असलेल्या धाडसी वृत्तीमुळेच त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. राणी लक्ष्मीबाई, चंद्रगुप्त मौर्य, भगतसिंग, राजगुरू अशा अनेक धाडसी लोकांच्या कथा सांगून नवीन पिढीमध्ये चांगल्या कार्यासाठी धाडसी वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**६) भावी पिढीला मार्गदर्शन :**

ऐतिहासिक घटनांची माहिती जमविणे आणि त्यांची सद्य:स्थितीतील घटनांशी सांगड घालण्याचा प्रयत्न लोककथांमुळे केला जातो. समाजातील सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रांचा मागोवा या लोककथांमध्ये घेतला जातो. त्यामुळे सद्य:स्थितीतील अनेक प्रश्नांची उकल ही गतकाळातील घटनांद्वारे करणे शक्य होते. एखाद्या राजकीय निर्णयाचे समाजावर पूर्वी काय पडसाद उमटले होते? तत्कालीन समाजावर त्याचे काय परिणाम झाले होते? याची माहिती कथांद्वारे भावी पिढीला देण्याचे काम केले जाते. अशाप्रकारे लोककथा, दंतकथा भावी पिढीला मार्गदर्शन करण्याचे काम करतात.

**७) प्रेरणा निर्माण करणे :**

भावी पिढीला मार्गदर्शन करण्याचे काम कथांद्वारे होत असते. त्यामुळे भावी पिढीमध्ये एक प्रकारची स्फूर्ती निर्माण होते. आपल्या पूर्वजांनी केलेल्या कार्यामुळे कोणते चांगले-वाईट परिणाम झाले आहेत यावरून चांगले कार्य करण्याची आणि वाईट प्रवृत्ती टाळण्याची प्रेरणा यातून मिळते.

**८) संस्कृतीचे पुनरुज्जीवन :**

कथांमधून संस्कृतीचे ज्ञान आपल्याला होत असते. आपल्या संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले जाते. समाजातील चालीरिती, रूढी, परंपरा यांचीही माहिती मिळते. यातून संस्कृतीचा विकास होण्यास मदत होते.

# कालगणना पद्धती

कालगणना पद्धती

गतकाळातील सर्व घटनांचा समावेश इतिहासात होतो. इतिहासामध्ये सन आणि घटना व या घटनांमागील उद्देश, विचार व निष्पत्ती यांचा अभ्यास केला जातो. इतिहासामध्ये विशिष्ट घटनांचा अभ्यास करताना काळाचा संदर्भ देणे आवश्यक ठरते. त्यातूनच कालगणनापद्धती विकसित झालेली दिसून येते. जगात काळाच्या ओघात अनेक संस्कृती उदयास आल्या, या संस्कृतींनी कालमापन व कालगणना पद्धती विकसित केल्या आहेत.

**कालगणनेच्या विविध पद्धती :**

**१) ऑलिम्पीड कालगणना :**

ग्रीक इतिहासात ऑलिम्पिक खेळास अतिशय महत्त्व आहे. ग्रीक इतिहास लेखनाची निश्चिती ही ऑलिम्पिक खेळापासून झाली. ऑलिंपिकचे वर्ष हे कालगणनेसाठी आधारभूत मानले जाऊ लागले. प्राचीन रोमन साम्राज्य क्रीडा महोत्सव साजरा केला जात असे, हा महोत्सव दर चार वर्षांनी होत असते. या महोत्सवाची आठवण म्हणून जी कालगणना सुरू झाली त्याला ऑलिम्पीड इयर असे संबोधले जाऊ लागले.

**२) सौरवर्षीय कालगणना :**

रोम शहराची स्थापना येशू ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी ७५३ वर्षे आधी झाली. युरोपात ही महत्त्वाची घटना असल्यामुळे या घटनेच्या आधारे कालगणनेस प्रारंभ झाला. या कालगणनेत १० महिन्यांचा किंवा ३०४ दिवसांचा एक वर्ष मानला जात होता. इ.स. पूर्व ४६ मध्ये ज्युलिअस सीझर याने सूर्याच्या गतीवर आधारित कालगणना पद्धतीची सुरुवात केली. त्यानुसार १२ महिन्यांचा किंवा ३६५ दिवसांचे एक वर्ष मानले जाऊ लागले. सूर्यावर आधारित ही कालगणना असल्यामुळे या गणनेला सौरवर्षीय कालगणना असे मानले जाऊ लागले.

**३) ग्रेगेरियन कालगणना (ख्रिस्ती कालगणना) :**

येशू ख्रिस्ताचा जन्म झाल्यावर येशूचा जन्म हा कालगणनेसाठी निश्चित मानला जाऊ लागला. ख्रिस्त जन्मापूर्वी आणि ख्रिस्त जन्मानंतर अशी कालगणना केली जाऊ लागली. युरोपात ही कालगणना लोकप्रिय झाली. पुढे इ.स. १५६२ मध्ये या कालगणनेलाच ग्रेगेरियन कॅलेंडर म्हणून ओळखले जाऊ लागले. संत ग्रेगोरी याने ख्रिस्ती कालगणनेत सुधारणा करून हा ख्रिस्ती कालगणनेचा वर्षाचा पहिला दिवस १ जानेवारी हा मानला जाऊ लागला.

**४) इसवी सन :**

ख्रिस्ती कालगणनेला 'इसवीसन' कालगणना म्हटले जाते. येशू ख्रिस्ताला पर्शियन भाषेत 'इसा मसिहा' म्हटले जाते. तर सन म्हणजे वर्ष त्यामुळे अशा इसा मसिहाच्या जन्मापासून कालगणेची सुरुवात झाली म्हणून या कालगणनेला इसवी सन असेही म्हणतात. म्हणूनच कालगणना इ.स. पूर्व म्हणजे ख्रिस्त जन्मापूर्वी आणि इ.स. नंतर म्हणजे ख्रिस्त जन्मानंतर अशी केली जाते.

**५) भारतीय कालगणना :**

प्राचीन भारतात पौराणिक कालगणना प्रचलित होती. सत्य, त्रेता, द्वापार व कलियुग असे चार युग मानले जाऊ लागले. पुराणामध्ये महाभारताचे युद्ध कलियुगाच्या सुरुवातीच्या काळात घडून आले. हे युद्ध भारताच्या प्राचीन इतिहासात महत्त्वाचे असल्यामुळे या घटनेच्या आधारे कालगणनेस प्रारंभ झाला. पौराणिक कालगणनेत कालमापनासाठी एककांचा वापर केला जात असे. क्षण, निमिष, कला, घटिका,

मुहूर्त, तिथी, वार, नक्षत्रे, दिन, रात्र, उत्तरायण, दक्षिणायन, संवत्सर, युगाब्द या एककांच्या सहाय्याने कालगणना केली जाऊ लागली. या कालगणनेनुसार चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुडीपाडवा हा भारतीय सौर वर्षाचा आरंभ मानला जाऊ लागला.

**६) इस्लामी कालगणना :**

भारतात मध्ययुगात इस्लामी कालगणनेस सुरुवात झाली. हिजरी आणि फसली या कालगणना या काळात प्रचलित होत्या. इसवी सन ६२२ मध्ये महम्मद पैगंबर हे मक्केहून मदिनेस गेले. त्यांनी मदिनेस जाण्याचे वर्ष हे इस्लामी काल गणनेचा प्रारंभ मानला जाऊ लागला. याला हिजरी कालगणना असे म्हटले जाऊ लागले. तर इ.स. १५५६ या वर्षी मुघल सम्राट अकबराचा राज्याभिषेक झाला त्यामुळे हा वर्ष 'फसली' कालगणना म्हणून प्रचलित झाली.

## ७ १.६ सनद (Sanad)

सनद

एखाद्या प्रदेशातील उत्पन्नावरील कायदेशीर हक्क म्हणजे सनद होय. मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेत या सनदांना महत्त्व प्राप्त झालेले होते. चौथाई, सरदेशमुखी आणि स्वराज्य या सनदा मराठ्यांना मिळाल्यावरच त्यांच्या साम्राज्यविस्ताराला गती मिळाली होती. राज्याच्या नियंत्रणात असलेल्या; परंतु राज्याच्या बाहेरील क्षेत्रात असलेल्या प्रदेशातील एकूण महसूल वसुलीच्या उत्पन्नाच्या चौथा हिस्सा स्वराज्याच्या खजिन्यात जमा करणे हा अधिकार म्हणजे चौथाई होय. ज्या प्रदेशातून चौथाई वसूल केली जाईल त्या प्रदेशातील प्रजेला संरक्षण देण्याची जबाबदारी चौथाई प्राप्त झालेल्या राज्यावर असेल, तर सरदेशमुखी म्हणजे त्या-त्या विभागाचा ठरविलेल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा आपल्याकडे ठेवणे व बाकी सर्व उत्पन्न सरकार दरबारी जमा करणे. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला यामुळे दक्षिणेतील राजकारणात शाहू राजे हे सनदशीर राज्यकर्ते झाले. या तिन्ही सनदा उत्पन्नाचे साधन होते. या सनदांमुळे स्वराज्याच्या आर्थिक व्यवस्थेत सुधारणा झाली.

## ७ १.७ मार्क्सवाद (Marxism)

मार्क्सवाद

कार्ल मार्क्सला 'आधुनिक समाजवादाचा प्रणेता' म्हटले जाते. समाजवादावरील कार्ल मार्क्सच्या विचारसरणीला मार्क्सवाद असे म्हणतात. तसेच कार्ल मार्क्सने मानवी जीवनातील गतकालीन घटनांविषयी शास्त्रीय पद्धतीने मांडलेले तत्त्वज्ञान याला मार्क्सवाद म्हटले आहे. मार्क्सच्या मते, सर्व ऐतिहासिक घटनांमागे आर्थिक बाबी कारणीभूत असतात. मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास असल्याचे मत मार्क्सने मांडले. तत्पूर्वी परंपरागत इतिहासात राजकीय घडामोडींवर भर दिलेला होता. मार्क्सने मात्र या राजकीय घडामोडींना महत्त्व न देता आर्थिक व सामाजिक घटकांच्या अध्ययनावर भर दिला. व्यक्ती किंवा घटना यांचा अभ्यास करण्याऐवजी दुर्लक्षित समाजगट, भिन्न सामाजिक व आर्थिक व्यवस्थांचा अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे मार्क्सवाद सांगतो. त्यासाठी ग्रामीण व्यवस्था, शेती, वर्णव्यवस्था यांच्या शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासाला मार्क्सवादात महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळेच मार्क्सवादी लिखाणाचे स्वरूप हे वर्णनात्मक नसून ते चिकित्सक स्वरूपाचे आहे. मार्क्सवादी लेखनाला बुद्धिवादाचे तसेच तर्कनिष्ठतेचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. २० व्या शतकात राष्ट्रवादी लेखनाचा प्रवाह हा गतिशील होता. त्यातच इतिहासकारांना नवे ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध होऊ

लागल्याने ते अधिक चिकित्सक बनले. याच दरम्यान मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव भारतीय इतिहासकारांवर पडला आणि ते मार्क्सवादी सिद्धांताच्या आधारे इतिहासाचा अभ्यास करू लागले. त्यांनी भारतीय इतिहासाचा अन्वयार्थ मार्क्सवादी मूलभूत धारणांच्या आधारे लावण्याचा प्रयत्न केला, मार्क्सवादी धारणेनुसार सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन यांना आर्थिक व्यवहार निर्धारित करीत असतात तसेच भौतिक विकास द्वंद्वात्मक पद्धतीने होतो असे विचार मांडले.

## ७.१.८ नवमार्क्सवाद (New Marxism)

मार्क्सवादी विचारप्रणालीतूनच नवमार्क्सवाद ही संकल्पना उदयास आली. मार्क्सचा संघर्षवादी सिद्धांत हा संकुचित असल्याचे प्रतिपादन करून नवमार्क्सवाद्यांनी तिला नवीन स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. इतिहासात राजघराण्यांच्या अभ्यासाला महत्त्व न देता नवमार्क्सवाद्यांनी सर्वसामान्य लोकांच्या इतिहासाला महत्त्व दिले आणि त्यांचा इतिहास शोधण्यावर भर दिला. मार्क्सवादाने मानवी जीवनात उत्पादनाची प्रक्रिया महत्त्वाची मानली आहे. तर नवमार्क्सवाद्यांच्या मते, मानवी जीवनात केवळ उत्पादन वस्तूंना महत्त्व नसून धर्म, संस्कृती, साहित्य, कला या बाबींना सुद्धा महत्त्व आहे. केवळ आर्थिक कारणाने वर्गसंघर्ष उद्भवतो असे नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रांतही हा संघर्ष आढळून येतो, असे नवमार्क्सवाद्यांनी प्रतिपादन केले आहे. सामाजिक संघर्ष त्याला कारणीभूत असणारे घटक यांचे संघर्षवादी सिद्धांताच्या भूमिकेतून नवमार्क्सवादी विवेचन करतात. अँटोनिओ, ग्रामची, जॉर्ज लुकाक, फ्रेडरिक जेमसन, बिपीन चंद्र यांचे नवमार्क्सवादी विचारवंत म्हणून योगदान मोठे आहे.

## ७.१.९ आधुनिकवाद / आधुनिकतावाद (Modernism)

आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, मूल्ये, विचार यानुसार समाजातील विविध पातळ्यांवर जे बदल घडवून आणले गेले त्यास आधुनिकता असे म्हणता येईल. भारतात आधुनिकतेस सुरुवात ब्रिटिशांच्या काळात झालेली दिसून येते. सुरुवातीच्या काळात ब्रिटिशांनी भारतीय समाजव्यवस्थेत हस्तक्षेप न करता आपले प्रशासकीय धोरण राबविले. नंतरच्या काळात काही ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या उदारमतवादी धोरणामुळे त्यांनी भारतात सुधारणा घडून आल्या. त्यामुळे भारतातील पूर्वीच्या परिस्थितीत बदल घडून आला. परिणामी राष्ट्रवाद, बुद्धिवाद, व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, समता हो मूल्ये, लोकशाही एकछत्री अंमल, औद्योगिकीकरण, खुला व्यापार, व्यापक अर्थव्यवस्था या गोष्टींना चालना मिळाली. जुनी परंपरागत मूल्ये बाजूला सारून नवीन मानवतावादी विचारांचा पुरस्कार केला गेला. आधुनिक काळात धार्मिक सुधारणा, स्त्रीविषयक तसेच जातिभेद निर्मूलनासाठी चळवळी उभ्या राहिल्या ब्रिटिशांनी जी गुलामगिरी लादली होती. त्या विरोधात राष्ट्रीय चळवळी झाल्या. याचा परिणाम म्हणजे भारताला मिळालेले स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्यानंतरही भारतीय संविधानात नव्या मूल्यांचा स्वीकार केला गेला. धर्म, भाषा, वंश, जात या बाबी गौण मानल्या जाऊन व्यक्तीच्या गुणवत्तेला आणि कर्तृत्वाला महत्त्व प्राप्त झाले. सर्वांना समान संधी मिळाली परिणामी सामाजिक गतिशीलता वाढीस लागली. नवनवे शोध, तांत्रिक प्रगती यामुळे औद्योगिक क्रांती घडून आली. मानवी जीवन सुखी व संपन्न झाले. अनिष्ट चालीरिती, रूढी, परंपरा नष्ट झाल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शिक्षणाचे महत्त्व वाढले. आधुनिक युगामुळे मानवाची गुलामगिरीतून मुक्तता झाली. मानवाला केंद्रबिंदू मानले जाऊन त्याच्या कल्याणाचा विचार केला जाऊ लागला.

## १.१० उत्तर आधुनिकवाद (Post Modernism)

उत्तर आधुनिकतावाद

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वीस-पंचवीस वर्षांत पाश्चात्त्य जगात निर्माण झालेला एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे उत्तर आधुनिकवाद होय. उत्तर आधुनिकवाद हा एक सिद्धांत अगर एकजिनसी विचार नाही, तर अनेक विचारांचा मिळून बनलेला तो एक संच आहे. साधारणतः अठराव्या शतकाच्या मध्यापासून ते १९५० पर्यंतचा काळ हा 'आधुनिक कालखंड' मानण्यात येतो. १९८० नंतर उत्तर आधुनिकवाद ही संज्ञा प्रचारात आली. या सुमारास पाश्चात्त्य जगात, तेथील जीवनपद्धतीत, संस्कृतीत झालेले परिवर्तन जीवनातील विविध घटक, त्याकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन व वेगवेगळ्या वैचारिक भूमिका या सर्वांचा एकत्रितपणे विचार म्हणजे उत्तर आधुनिकवाद असे म्हटले जाते. सुरुवातीला साहित्य, कला या क्षेत्रात या संज्ञेचा वापर केला गेला व नंतर इतिहास, तत्त्वज्ञान या क्षेत्रातही त्याचा प्रसार झाला. पाश्चात्त्य जगात घडून आलेले सांस्कृतिक बदल हा उत्तर आधुनिकवादाचा गाभा आहे. उत्तर आधुनिकवाद या संकल्पनेबाबत वेगवेगळ्या विचारवंतांनी विभिन्न विचार मांडलेले आहेत. त्यामुळे उत्तर आधुनिकवादाची सर्वव्यापी व्याख्या करणे कठीण आहे.

### ◈ १.१०.१ उत्तर आधुनिकवाद : अर्थ :

उत्तर आधुनिकवाद या शब्दप्रयोगात उत्तर व आधुनिक असे दोन शब्द एकत्र जोडलेले आहेत. म्हणजेच याचा अर्थ कलाक्रमानुसार आधुनिक नंतरचा असा होतो; परंतु येथे केवळ कालक्रमाचा संदर्भ नाही तर त्याहून अधिक अर्थ अपेक्षित आहे. उत्तर आधुनिकवाद ही आधुनिकवादाविरुद्धची बौद्धिक व मानसिक प्रतिक्रिया आहे. पाश्चात्त्य जगात, तेथील जीवनपद्धतीत व संस्कृतीत तसेच जीवनाच्या विविध घटकांत झालेले परिवर्तन व त्याकडे पाहण्याचे विभिन्न दृष्टिकोन व वैचारिक भूमिका यांचा गुंतावळा म्हणजे उत्तर आधुनिकवाद होय असे म्हणता येईल.

### ◈ १.१०.२ उत्तर आधुनिकवाद : व्याख्या :

**डॉ. मेरी क्लेग्ज :**

"सामाजिक इतिहासात दिशा, उत्क्रांती व प्रगती लुप्त झाली आहे आणि वैश्विक चिरकालीन सत्याचा-मूल्यांचा ऱ्हास व सापेक्षतेच्या उदयाचा विचार म्हणजे उत्तर आधुनिकवाद होय."

### ◈ १.१०.३ उत्तर आधुनिकवादाची वैशिष्ट्ये :

विसाव्या शतकाच्या मध्यात मूल्यनिष्ठतेचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होऊ लागला. तात्त्विक सिद्धांत, मूल्यवादी लिखाण हे सर्व निरर्थक असून मानव जातीला स्थैर्य देण्यास असमर्थ आहेत. परंपरागत शाश्वत मूल्ये फोल आहेत अशी मनोभूमिका जगात निर्माण झाली. एक भयानक वैचारिक पोकळी यामुळे निर्माण झाली; परंतु या काळात शास्त्रीय ज्ञानाची व तंत्रज्ञानाची प्रगती मोठ्या प्रमाणावर होत राहिली. त्यातून जागतिकीकरणाला गती मिळाली. राष्ट्रा-राष्ट्रांतील सीमा धूसर बनल्या. भिन्न समाज परस्परांजवळ येऊ लागल्याने संमिश्र स्वरूपाची संस्कृती उदयाला आली. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जगाच्या एका कोपऱ्यातील माहिती दुसऱ्या कोपऱ्यात क्षणात पोहोचू लागली. अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवा जागतिक समाज, नवी जागतिक संस्कृती निर्माण झाली.

अशा या आधुनिकेत्तर समाजाचे दर्शन घडविणारे, त्याची चर्चा करणारे, त्यावर भाष्य करणारे, समाजजीवनाच्या भिन्न क्षेत्रातील त्याच्या प्रभाव व स्वरूपाचे विश्लेषण करणारे लिखाण उत्तर आधुनिकवादाचे दर्शन घडविते. डॉ. मेरी क्लेग्ज यांनी विविध ज्ञानशास्त्रांतील उत्तर आधुनिकवादाचा अभ्यास करून उत्तर आधुनिकवादाची काही समान वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१) सापेक्षतेचा प्रभावी विचार.

२) वैश्विक चिरंतन सत्यावरील निष्ठेचा ऱ्हास.

३) प्रयोजनवादाचा ऱ्हास.

४) सांस्कृतिक प्रकारांचे विभक्तीकरण आणि सांस्कृतिक गोंधळ व अराजक मौजेने साजरा करण्याची प्रवृत्ती.

५) ऐतिहासिक परीवर्तनाची दिशा व उद्दिष्ट यांच्या जाणिवेचा अभाव.

६) सर्व विद्याशाखांचे विभागीकरण आणि समस्यांची सोडवणूक करू न शकणाऱ्या विभिन्न दृष्टिकोनाचा उदय.

### ◈ १.१०.४ उत्तर आधुनिकवादाचे स्वरूप :

उत्तर आधुनिकवादाबाबत अनेक विचारवंतांनी लेखन केलेले आहे. यात मार्क्सवादी अभ्यासकांचा भरणा अधिक असल्याचे दिसते. उत्तर आधुनिकवादाचे सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही पैलू आहेत. उत्तर आधुनिकवाद ही आधुनिकवादाविरुद्धची प्रतिक्रिया आहे असेही म्हटले जाते.

उत्तर आधुनिकवादाच्या स्वरूपाबाबत पुढील काही मुद्दे सांगता येतील :

१) प्रबोधन काळात आधारभूत असलेली तत्त्वे उत्तर आधुनिकवाद अमान्य करतो, त्यांना त्याज्य मानतो. म्हणूनच उत्तर आधुनिकवाद ही आधुनिकवादाविरुद्धची नकारात्मक प्रतिक्रिया मानली जाते.

२) आधुनिकतावादाने विवेकवाद, शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व व प्रगतीचा विचार जगाला दिलेला असूनही आधुनिकेत्तर काळातील समस्या सुटल्याचे दिसत नाही. विवेकवादाने जागतिक शांती, जगाचे कल्याण अशा आशा निर्माण केलेल्या होत्या. पण जागतिक शांततेचे हे स्वरूप मृगजळच ठरलेले दिसते. १९५० नंतर जगात अनेक संघर्ष घडून आले. दोन जागतिक विचारप्रणालींनी हिंसक रूप घेतले. विद्यार्थ्यांचे, दुर्लक्षित वर्गांचे उठाव घडून आले. यातूनच विवेकवादाची निरर्थकता दिसून येते. म्हणून उत्तर आधुनिकवाद विवेकाचे महत्त्व नाकारतो.

३) उत्तर आधुनिकवादाने महान वैश्विक तत्त्वज्ञान निरर्थक मानले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला असला तरी नीतिमूल्यांचा ऱ्हास झाल्याने मानवाची अधोगती होत आहे, त्यामुळे मानवी प्रगतीचा हेगेलचा सिद्धांत खोटा ठरलेला दिसतो. तसेच जगातील सर्व कामगार मिळून समतेवर आधारित समाजवादी व्यवस्था उभारतील हा सिद्धांतही रशियातील समाजवादी शासनाचा अंत झाल्यामुळे खोटा ठरला आहे.

४) शास्त्रीय पद्धतीने मानवी जीवनाचा अभ्यास करून सुव्यवस्था निर्माण होते हा विचारही खोटा ठरलेला दिसतो. त्यामुळे शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व हा विचार उत्तर आधुनिकवादाने भ्रामक मानलेला आहे. शास्त्रीय ज्ञानाचा अधिकार उत्तर आधुनिकवादाने नाकारलेला आहे.

५) मानवी जीवन ही अनेक खंडित घटनांची मालिका आहे, त्यात एकसूत्रता नसते. मानवी जीवनाची वाटचाल एका सरळ रेषेत होत नाही. त्यामुळे एका सूत्राचा शोध घेण्याऐवजी एकेक घटनांचा अभ्यास केला जावा असे उत्तर आधुनिकवाद सांगतो.

६) मानवी जीवनाचे खंडित, अस्थिर स्वरूप मान्य करावे आणि संपूर्ण मानव जातीला एका चौकटीत बांधण्याचा प्रयत्न करू नये. वैश्विक विचाराऐवजी स्थानिक, प्रासंगिक, एककालिक विषयांचा अभ्यास करावा, लहान दुर्लक्षित घटकांवर लक्ष केंद्रित करावे असे उत्तर आधुनिकवादाचे तत्त्व आहे.

७) भिन्न संस्कृतीच्या मिश्रणाचे उत्तर आधुनिकवादाने स्वागत केले आहे. माहिती प्रसार माध्यमांतील प्रगतीमुळे जग हे अतिशय जवळ आलेले आहे. क्षणार्धात जगातील एका कोपऱ्यातील माहिती दुसऱ्या कोपऱ्यात पोहोचू शकते यातून विभिन्न संस्कृती व समाजगट यांच्यातील परस्परसंबंध घनिष्ठ बनले व अशा संस्कृतींचे

काही प्रमाणात एकमेकात मिश्रण होऊ लागले. युरोपीय खाद्य पदार्थ पौर्वात्य मसाले घालून तयार करून अमेरीकेत विकले जातात हे अशाच संस्कृती मिश्रणाचे उदाहरण म्हणावे लागेल. परस्परविरोधी विविध गोष्टींची विचित्र सरमिसळ असेच उत्तर आधुनिकवादाचे स्वरूप आहे.

८) उत्तर आधुनिकवाद लिंगभेदात उच्च-नीचं भाव मानत नाही. आधुनिक काळात सर्व समाजगटांचे प्रतिनिधित्व करण्याचे व त्यांच्या वतीने बोलण्याचे काम अभिजन वर्गच करीत असे. मात्र आधुनिकोत्तर काळात प्रत्येक गटाला बोलण्याचे, भावना विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे हे उत्तर आधुनिकवादाने मान्य केले आहे.

## १.११ संरचनावाद (Structuralism)

संरचनावाद

संरचनावाद ही विसाव्या शतकात निर्माण झालेली एक नवी अध्ययन पद्धती आहे. या प्रवाहाने अध्ययनाचा नवा दृष्टिकोन, नवा मार्ग, नवी दिशा पुरस्कृत केली. पाश्चात्य जगातील ज्ञानशाखांत विसाव्या शतकांत जे नवे विचारप्रवाह व ज्या नव्या अध्ययन पद्धती रूढ झाल्या, त्यापैकी संरचनावाद ही एक आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत हा प्रवाह अधिक प्रभावी बनला होता. अनेक प्रतिभावंत लेखक या विचारप्रणालीने प्रभावित झाले. १९७० च्या सुमारास या विचारप्रणालीने काहीशा भिन्न विचारप्रवाहांना जन्म दिला.

### ◈ १.११.१ संरचनावाद : अर्थ :

संरचनावाद हे तत्त्वज्ञान नाही. ती केवळ एक अध्ययन पद्धती आहे. या पद्धतीचा वापर वेगवेगळ्या विचारवंतांनी आपआपल्या अभ्यासक्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारे केला. मानववंशशास्त्राच्या दृष्टीने विचार करता, समाजाच्या अगर समाजगटांच्या दृश्य व्यवहारांच्या खाली दडलेल्या आंतर रचनांचा, त्यातील घटकांच्या परस्परसंबंधाच्या आंतरव्यूहाचा बुद्धिनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीने शोध घेण्याची अध्ययन पद्धती म्हणजे संरचनावाद होय.

समाजशास्त्राच्या अभ्यासात संरचनावाद म्हणजे समाज आणि व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंधांचा व क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास करणारी एक विज्ञानशाखा होय.

अध्ययन विषयाच्या विश्लेषणाची शास्त्रीय व तर्कनिष्ठ पद्धती संरचनावादाने प्रचारात आणली. तिचा उगम भाषाशास्त्रीय अध्ययनातून झाला असला तरी तिचा वापर विभिन्न ज्ञानशाखांत-मानसशास्त्र, समाजशास्त्र, भौतिकशास्त्र, तंत्रशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादीमध्ये केला गेला. त्यामुळे भिन्न ज्ञानशाखांत प्रसृत झालेल्या या विश्लेषण पद्धतीला आंतर ज्ञानशास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले.

### ◈ १.११.२ संरचनावाद : व्याख्या :

संरचनावादाची शब्दाकोशातील स्थूलमानाने केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :

"संपूर्ण सामाजिक व्यवहार व विचारातून आविष्कृत होणाऱ्या समाजाच्या आंतररचनांच्या आकृतिबंधाचा शोध घेणे व दर्शविणे म्हणजे संरचनावाद होय." भिन्न अभ्यास शाखांबाबतचा वैचारिक दृष्टिकोन ही व्याख्या दर्शविते.

### ◈ १.११.३ संरचनावादाचा उदय :

स्वित्झर्लंडमधील भाषाशास्त्रज्ञ फर्डिनांड द सोस्यूर याच्या 'Course de Linguistic Generate' या ग्रंथात संरचनावाद या संज्ञेचा उगम झालेला दिसतो. या ग्रंथात त्याने भाषेच्या रचनेबाबत काही सिद्धांत मांडले आहेत. भाषा रचनेच्या त्याने केलेल्या विश्लेषणामुळे जेक बसन, फुकाते, केनीस, बार्थ असे अनेक विचारवंत प्रभावित झाले.

एमिल दरखिम हा समाजशास्त्राच्या क्षेत्रात संरचनावादाचा अग्रदूत मानला जातो. इतिहासाच्या क्षेत्रात संरचनावादाचा आविष्कार ॲनल्स गटातील ब्लॉच, फाब्रे, ब्रोदेल यांच्या व क्लॉद लेकी स्ट्रॉस यांच्या लेखनातून निदर्शनास येतो.

### ◈ १.११.४ संरचनावादाची मूलभूत तत्त्वे :

**१) घटकांतील परस्परसंबंधांचे महत्त्व :**

संरचनावादी दृष्टिकोनाच्या मूलभूत भूमिकेवरून संरचनावादी विचारपद्धतीचे आकलन होते. संरचनावाद ज्या अध्ययन विषयांचा किंवा मानवी घडामोडींचा अभ्यास करतो, तो विषय अनेक लहान-लहान घटकांनी मिळून बनलेला असतो. यातील प्रत्येक घटकाला स्वतंत्रपणे काही स्थान नाही, मात्र प्रत्येक घटक दुसऱ्या घटकाशी जेव्हा स्थिर संबंध प्रस्थापित करतो तेव्हा त्याला अर्थ प्राप्त होतो. यातूनच अनेक घटकांचे मोठे जाळे, एक रचना तयार होते. त्यामुळेच रचनेच्या निर्मितीच्या दृष्टीने घटकातील परस्परसंबंध महत्त्वपूर्ण ठरतात.

S.B.V.P.S. S.M.B.S.T. College, Sangamner • LIBRARY •

**२) आंतररचनेचे महत्त्व :**

आंतररचनेचे दोन स्तर मानले जातात :

अ) पहिली वरवर दिसणारी दृश्य स्वरूपातील पृष्ठभागावरील रचना व

ब) दुसरी म्हणजे पृष्ठभागावरील रचनेच्या अंतर्गत असणारी, घटकांच्या परस्परसंबंधांची आंतररचना.

संरचनावादामध्ये आंतररचना अधिक महत्त्वाची मानली जाते. पृष्ठभागावरील दृश्य रचनेचा अभ्यास यात अभिप्रेत नाही. आंतररचनेमुळेच वरच्या रचनेला अर्थ प्राप्त होत असतो. वास्तवाची बौद्धिक व मानसिक जाणीव आंतररचनेद्वारे व्यक्त होत असते व यातूनच मानवी हालचाली तसेच संस्कृतीचे आकलन होते.

**३) घटकांच्या परस्परसंबंधांची रचना :**

संरचनावादामध्ये घटकांमधील परस्परसंबंधांची रचना अगर व्यवस्था ही परस्परविरोधी संकल्पनांच्या जोडीवर आधारलेली असते. उदा. प्रकाश - काळोख, जीवन-मृत्यू, निसर्ग-संस्कृती अशा परस्परविरोधी घटनांमधून घटकांचे परस्परसंबंध दर्शविले जातात.

**४) ऐतिहासिकतेला स्थान नाही :**

संरचनावादामध्ये ऐतिहासिकतेला काही महत्त्व नाही. गोष्टीचा अगर घटनेचा विचार करीत असताना ऐतिहासिक संदर्भाचा विचार ते करीत नाहीत. घटनेच्या एककालिकतेवर ते भर देतात. घटनेचा आशय, कारणे, परिणाम यांचा विचार न करता त्या घटनेतील लहान घटकांच्या आंतरसंबंधाचा ते विचार करतात.

**५) अंतःसूत्र वा आंतरव्यवस्था समजून घेण्याचा उद्देश :**

कोणत्याही विषयातील अंतःसूत्र अगर आंतरव्यवस्था समजून घेण्याचा संरचनावादाचा उद्देश आहे. हा उद्देश व हेगेल व मार्क्स यांची अध्ययन पद्धती यात काही प्रमाणात साम्य आढळते. या दोहोंचेही अध्ययन घटनाकेंद्रित किंवा व्यक्तिकेंद्रित नाही; परंतु हेगेल व मार्क्स यांच्या दृष्टिकोनात व संरचनावादाच्या दृष्टिकोनात भेदही आहेत. अंतःसूत्राचा शोध घेण्यासाठी हेगेल व मार्क्स हे दृश्य घटनांचा अभ्यास करतात मात्र संरचनावादी घटना व व्यक्तिकेंद्री अभ्यास त्याज्य मानून केवळ आंतररचनेचाच विचार करतात.

**६) घटनाधारित इतिहासाला विरोध :**

रोलाँ बार्त याने घटनात्मक इतिहास अर्थपूर्ण नसतो अशी टीका केली आहे. घटनाधारित इतिहास वास्तवतेचे दर्शन घडवितो असे मानले जाते; परंतु इतिहास हे गतकालीन वास्तवाचे दर्शन नाही तर लेखकाला जे वास्तव वाटले त्याची प्रतिमा असते. इतिहास हे वास्तव घटितांचे संकलन नसून इतिहासकाराचे मुख्य कार्य

वास्तवाच्या प्रतिमा संकलित करून त्याचे दर्शन घडविणे हे आहे. स्ट्रॉस यानेही इतिहासाचे संरचनावादी अध्ययन हे ऐतिहासिकतेपासून विलग असल्याचे म्हटले आहे.

**७) विश्व-एक प्रचंड यंत्र :**

संरचनावादाने सर्व विश्व हे एक प्रचंड यंत्र असल्याचे म्हटले आहे. अगणित लहान-मोठ्या घटकांनी मिळून हे यंत्र तयार होते. मात्र यातील घटकांचे स्वतंत्र असे काही अस्तित्व नसते. एकटा घटक अर्थहीन असतो. मात्र जेव्हा तो दुसऱ्या घटकांशी जोडला जातो तेव्हा तो क्रियाशील बनतो. अशा अनेक सुसंबद्ध घटकांच्या रचनेच्या अभ्यासावरून यंत्राचे स्वरूप कळते.

याच प्रकारे मानवी समाजात, साहित्यात अनेक लहान घटक असतात. इतिहासात अनेक घटना असतात. त्यांना एकाकी अवस्थेत अर्थ नसतो. ते जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यातील परस्पर संबद्धतेमुळे एक रचना तयार होते. घटकांच्या आंतररचनेवर व त्यामुळे आढळणाऱ्या बदलांवर संरचनावादाने भर दिला आहे.

**८) मानवी समाज - घटकांच्या संबंधांचे जाळे :**

मानवी समाज हा अनेक घटकांच्या संबंधांचे जाळे आहे. त्यातील अंतःसूत्राचा शोध घेणे अभ्यासकाचे काम आहे. घटना महत्त्वाच्या नसून, त्यात दडलेली, घटनांद्वारे व्यक्त होणारी व्यवस्था ही महत्त्वाची आहे असे संरचनावादी मानतात. अनेक घटनांच्या परस्परसंबंधाच्या अभ्यासावरून त्यामागील मानवी संबंधांचे स्वरूप, संस्कृतीचे स्वरूप व मूळ मानवी स्वभावाचे आकलन होते.

## १.१२ उत्तर संरचनावाद (Post-Structuralism)

उत्तर संरचनवाद

१९ व्या शतकाच्या अखेरीस उत्तर संरचनावाद ही संज्ञा प्रचलित झाली. संरचनावादानंतरची ही संकल्पना होय. मिशेल फुको याने उत्तर संरचनावादाचा पुरस्कार केला. उत्तर संरचनावादी आंतरव्यवस्थेचा शोध घेण्याऐवजी घटकांचा अभ्यास महत्त्वाचा मानतात.

**अ) उत्तर संरचनावाद :**

संरचनावाद कोणत्याही विषयातील आंतरव्यवस्थेचा शोध घेतो तर उत्तर संरचनावाद आंतरव्यवस्थेतील संबंध नेमक्या स्वरूपाचा असतो हे शोधण्याचा प्रयत्न करतो. उत्तर संरचनावाद्यांचा मते, कोणतीही रचना व तिचा अर्थ संदिग्ध व गुंतागुंतीचा असतो. माणूस हा मुख्यत्वे समाजाची निर्मिती आहे. कुटुंब, भौतिक स्थिती, परंपरा यातून तो घडत असतो. वास्तव हे विस्कळीत, खंडित स्वरूपाचे असल्यामुळे उत्तर संरचनावादी आंतरव्यवस्थेचा शोध घेण्याऐवजी घटकांचा अभ्यास महत्त्वाचा मानतात. त्यांच्या लेखनात वरवरचा आशय असतो व त्याचबरोबर अतिरिक्त अर्थाचे विश्लेषणही आढळते. त्यामुळे उत्तर संरचनावाद, संरचनावादापेक्षा अधिक व्यापक व परिणामकारक वाटतो.

**ब) उत्तर संरचनावादाची वैशिष्ट्ये :**

**१) प्रत्यक्षवादाविरोधी भूमिका :**

संरचनावादी दृष्टिकोन हा विसाव्या शतकापर्यंत पाश्चात्त्य जगातील बौद्धिक क्षेत्रात प्रभावी असलेल्या प्रत्यक्षवादाविरुद्धची प्रतिक्रिया होती. म्हणजेच संरचनावादाने प्रत्यक्षवादाला विरोध केला आहे. त्याप्रमाणे उत्तरसंचरनावादही प्रत्यक्षवाद या तत्त्वाला विरोध करतो.

**२) मानवकेंद्री अभ्यासास विरोध :**

मानवकेंद्री अभ्यास व व्यक्तिकेंद्री इतिहास हा उत्तर संरचनावादींना खरा वाटत नाही. ज्ञानाचे वैश्विक स्वरूप ते मान्य करीत नाहीत.

**३) घटकांचा अभ्यास महत्त्वाचा :**

मानवी जाणिवांची रचना स्थिर नसते. उत्तर संरचनावादी आंतरव्यवस्थेला महत्त्व देत असले तरी घटकांच्या अभ्यासाला ते महत्त्व देतात.

**४) सिद्धांतांचा संच :**

उत्तर संरचनावाद ही एकसूत्री तत्त्वप्रणाली नसून काही सिद्धांताचा संच आहे.

थोडक्यात, उत्तर संरचनावाद हा संरचनावादापेक्षा अधिक व्यापक आणि परिणामकारक आहे. उत्तर संचरनावादाचे इतिहासातील योगदान महत्त्वाचे आहे.

◈◈◈

## सरावासाठी प्रश्न

**प्र. १. खालील प्रश्नांची २५० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. पुराभिलेख यावर टीप लिहा. (Refer Sub Point 1.3)

२. कालगणनेच्या विविध पद्धतींची चर्चा करा. (Refer Point 1.5)

३. नवमार्क्सवाद याविषयी सविस्तर माहिती द्या. (Refer Sub Point 1.8)

**प्र. २. खालील प्रश्नांची ५०० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. संरचनावाद म्हणजे काय ते सांगून संरचनावादाची मूलभूत तत्त्वे स्पष्ट करा. (Refer Point 1.11)

२. उत्तर आधुनिकवाद म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा. (Refer Point 1.10)

**प्र. ३. टिपा लिहा.**

१. मौखिक इतिहास. (Refer Point 1.4)

२. स्वयंशोध. (Refer Point 1.2)

२. मार्क्सवाद. (Refer Point 1.7)

...

954.04/

*001-032038*

Acc. No.:SR-32038